**ठळक बातम्या**

- नागपुरात दंगल घडलेल्या ठिकाणी आता शांतता असून संचारबंदी शिथील करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- गडचिरोली जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यामुळे होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तातडीनं उपाययोजना करण्याचे  मुख्यमंत्र्यांचे निर्देश

- लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना न्याय्य पद्धतीने झाली पाहिजे, अशी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मागणी

- यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांना जाहीर

**आणि**

- १८व्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

नागपूरात दंगल घडलेल्या ठिकाणी आता शांतता असून सध्या लागू असलेल्या संचारबंदीच्या निर्बंधात शिथीलता देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूरच्या पोलीस आयुक्तालयात घेतलेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. पोलिसांनी ४- ५ तासातच या घटनेला आवर घातला असं ते म्हणाले. या घटनेचं  सी सी टी व्ही फुटेज आणि इतर चित्रिकरणांच्या सहाय्यानं दंगेखोरांचा शोध सुरु आहे. १०४ आरोपींची ओळख पटली असून आतापर्यंत ९२ जणांना अटक केली आहे अशी माहिती त्यांनी दिली. दंगलीत सहभागी असलेल्या प्रत्येकावर कठोर कारवाई करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. समाज माध्यमातून प्रक्षोभक पोस्ट किंवा चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्यांनाही सहआरोपी करून घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अफवा

पसरवण्यात सहभागी असलेल्यांवरही कारवाई करणार असून ज्यांचं वैयक्तिक किंवा वाहनांचं नुकसान झालं आहे अशा सर्वांना येत्या ३ ते ४ दिवसात नुकसानभरपाई मिळेल, अशी माहिती त्यांनी दिली. जे नुकसान झालं असेल त्याची भरपाई दंगेखोरांकडून करणार असून त्यांनी भरपाई न दिल्यास त्यांची मालमत्ता विकून भरपाई करून घेणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

नागपूरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या एकाचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला. इरफान अन्सारी असं या ४० वर्षीय इसमाचं नाव आहे. १७ मार्च रोजी नागपूर इथं झालेल्या हिंसाचारात अन्सारी हे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते, मात्र आज त्यांचा मृत्यू झाला.

<><><><><>

देशाच्या मध्यभागी असलेलं नागपूर हे शांततेचं प्रतीक आहे, इथं कधीही दंगली झाल्या नाहीत. हिंदू-मुस्लिम समाजाचं अतूट प्रेमाचं नातं या शहरात आहे. हे नातं तोडण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ देता कामा नये, असं आवाहन काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे यांनी आज नागपूर इथं केलं. काँग्रेस सत्यशोधन समितीनं नागपूर हिंसाचार प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. कोणत्याही कारणाने सामान्य माणसांचं नुकसान होणं दुर्दैवी आहे, असंही ठाकरे यांनी सांगितलं. भारतीय जनता पक्ष आणि विश्व हिंदू परिषद, बजरंग दल अशा त्यांच्याशी संलग्न संघटनांनी चिथावणीखोर वक्तव्यं करायचा कार्यक्रमच हाती घेतला असून हे शब्द महाराष्ट्राच्या जनतेला तोडणारे आहेत, असा आरोप ठाकरे यांनी केला.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यामुळे होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तातडीनं उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देंवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. यामध्ये गेल्या पाच वर्षात वाघ्र हल्ल्यात म्रृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना विशेष नुकसान भरपाई देणं, अतिरिक्त वाघांचं स्थलांतर याचा समावेश असून याबाबतचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात, विशेषतः चार्मोशी, आरमोरी, वडसा आणि धानोरा क्षेत्रात गेल्या पाच वर्षांत व्याघ्र हल्ल्यात सुमारे ५० पेक्षा जास्त नागरिक मृत्युमुखी पडले आहेत.

**<><><><><>**

लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना न्याय्य पद्धतीने झाली पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. त्या आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होत्या. पुनर्रचनेसंदर्भात तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी बोलावलेली पहिली सर्वपक्षीय बैठक आज चेन्नई इथं झाली. त्या पार्श्वभूमीवर सुळे बोलत होत्या. सामाजिक दृष्ट्या प्रगल्भता दाखवत दक्षिणेकडच्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात बाजी मारली आहे. लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना झाली तर त्या राज्यांना अधिक लोकसंख्येच्या राज्यांच्या तुलनेत कमी प्रतिनिधित्व मिळेल. असं त्या म्हणाल्या. ‘एक देश - एक निवडणूक’ साठी नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीसमोरही विरोधी पक्ष सदस्यांनी हा मुद्दा वारंवार उपस्थित केला आहे, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत तमिळनाडूचे मुख्यमंत्री M.K. स्टालिन यांनी बोलावलेली सर्वपक्षीय बैठक आज चेन्नई इथं होत आहे. आपला पुनर्रचनेला विरोध नाही तर पुनर्रचना न्याय्य व्हावी, अशी आपली मागणी

असल्याचं स्टालिन म्हणाले. मतदारसंघांची पुनर्रचना लोकसंख्येच्या आधारावर झाल्यास लोकसंख्या नियंत्रण यशस्वीपणे राबवणाऱ्या  राज्यांवर अन्याय होईल, असं ते म्हणाले. पुनर्रचना करताना देशाच्या विविधतेचं रक्षण व्हायला हवं, अशी भूमिका केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी मांडली. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हे देखील या बैठकीला उपस्थित आहेत. दरम्यान, ही सर्वपक्षीय बैठक वृथा असल्याची टीका भाजपानं केली आहे.

**<><><><>**

ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांना अर्थशास्त्रातल्या भरीव योगदानासाठी वर्ष २०२५साठीचा 'पुण्यभूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुष्यभूषण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. या पुरस्काराचं हे ३७वं वर्ष आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा लवकरच होणार असून यात देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत असताना जखमी झालेल्या चार जवानांचा आणि एका वीरमातेचा गौरव मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><>**

आज जागतिक जल दिवस आहे. आजचा दिवस पाण्याच्या जिवंत स्रोतांचं महत्व अधोरेखित करून त्याच्या शाश्वत व्यवस्थापनाचा पुरस्कार करतो. जगभरातल्या जलसंकटाचा सामना करण्यासाठी  जागरूकता निर्माण करून, कृतीला प्रेरणा देणं हे याचं उद्दिष्ट आहे. जागतिक जल दिवस हा २०३० सालापर्यंत सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता सुनिश्चित करण्याच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडला  आहे. 'हिमनद्यांचं संवर्धन', ही  यंदाच्या जल दिनाची संकल्पना आहे.

**<><><><>**

भारत आज 'अर्थ अवर', या जगातल्या सर्वात मोठ्या पर्यावरण विषयक चळवळीत सहभागी होणार आहे. दर वर्षी मार्च महिन्यातल्या एका शनिवारी रात्री साडे आठ ते साडे नऊ या वेळात 'अर्थ अवर'चं आयोजन केलं जातं. यावेळी जगभरातले नागरिक अनावश्यक विद्युत उपकरणं बंद करतात. भारतातही सर्व प्रसिद्ध ठिकाणं, स्मारकं, सार्वजनिक- खासगी संस्था, व्यवसाय आणि समुदाय या उपक्रमात एकत्रितपणे सहभागी होतात. यंदा अर्थ अवरमध्ये जल संवर्धनावर विशेष लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. ऑस्ट्रेलियात सिडनी इथं २००७ साली वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर (WWF) ने द सिडनी मॉर्निंग हेराल्डच्या सहकार्याने 'अर्थ अवर' ची सुरुवात केली होती.

**<><><><><>**

क्रिकेट रसिकांचं लक्ष लागून असलेल्या आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला आजपासून कोलकात्यात सुरुवात होत आहे. कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात आज सलामीचा सामना होणार असून एकूण १० संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. आयपीएलचा हा १८वा हंगाम आहे.

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये बासेल इथं सुरु असलेल्या स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा सामना चीनच्या शेंग शु लिऊ आणि टॅन निंग या अव्वल मानांकित जोडीशी होईल. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ५ वाजून १० मिनिटांनी सामना सुरु होईल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरुपाची पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

नंदुरबार ग्रंथोत्सव - २०२४ ला आजपासून शहरात सुरुवात झाली. आज सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात आली, यामध्ये शालेय विद्यार्थिनींनी ग्रंथ, साहित्य आणि मान्यवरांचं औक्षण केलं. या वेळी जेष्ठ साहित्यिक निबींजीराव बागुल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय महासंघाचे कोषाध्यक्ष प्रविण पाटील, आदी मान्यवरांसह शिक्षक  आणि विद्यार्थी मोठया संख्येनं  उपस्थित होते, अशी माहिती आमच्या बातमीदारानं दिली.

**<><><><><>**

दोन समाजात तेढ निर्माण करणारे व्हिडिओ अथवा पोस्टर समाजमाध्यमांवर टाकणाऱ्यांविरोधात नंदुरबार शहरात मी नंदुरबार अशी जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे.  यासंदर्भात जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवणदत्त एस यांनी शहर पोलीस ठाण्यात शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेतली.  ही मोहीम समाजमाध्यमांवर राबवली जाणार आहे.

**//<><><><><>//**